दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर तीन वर्षे अत्याचार

मुंबई : मुंबईतील अंधेरी पूर्व परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीवर सलग तीन वर्षे लैंगिक अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली अंधेरी येथील एमआयडीसी पोलिसांनी शिंदे गटाशी संबंधित युवा नेता शिवम दुबे उर्फ चोंग्या याला अटक केली आहे. शिवम दुबेने आणखी किती तरुणींची अशी फसवणूक केली आहे का याचा तपास आता पोलीस करत आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शिवम दुबे हा अंधेरी पूर्व येथील महाकाली परिसराचा रहिवासी आहे.

गाव विकायला काढलं, आंदोलन केलं, अखेर पाणीप्रश्न मिटला

सोलापूर : कायमच्या दुष्काळामुळे थेट गाव विकायला काढलेल्या माढा तालुक्यातील तुळशी ग्रामस्थांचा प्रश्न आज सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कायमचा सोडवला आहे. जानेवारीपर्यंत पिण्याचे पाणी आणि शेतीच्या पाण्याचा मार्ग मोकळा होईल असं आश्वासन जयकुमार गोरे यांनी दिलं आहे. आज तुळशी ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या ग्रामसभेत पालकमंत्र्यांनी आचारसंहिता संपल्यानंतर तातडीने या कामांची सुरुवात केली जाईल असे सांगितले. यानंतर ग्रामस्थांनी घोषणाबाजी करत जल्लोष केला.

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. ०५ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

नवरात्री उत्सवांमध्ये 'दिल से' नाचायला सज्ज व्हा

पुणे : नवरात्रीच्या उत्सवाला सुरुवात होण्यापूर्वीच पुण्यात गरबा आणि दांडियाचा उत्साह पाहायला मिळत असून, भारतातील आघाडीचे मनोरंजन व्यासपीठ बुकमायशोवर शहरातील विविध नवरात्री कार्यक्रमांची तिकिटे उपलब्ध झाली आहेत. यंदा 'दिल से नवरात्री' अंतर्गत पुण्यासह विविध शहरांमध्ये १००० हून अधिक नवरात्री कार्यक्रम आणि २० हून अधिक बँक ऑफर्स उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पुण्यात दांडिया धूम ९.० हा १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान बालेवाडीतील द ऑर्किड हॉटेल येथे होणार असून, 'तारक मेहता का उल्टा चष्मा' फेम दिलीप जोशी आणि मयूर वकानी यांच्यासह रॉकिंग गोली सहभागी होणार आहेत. रास रंग दांडिया ४.० हा बीएचएस ओपन ग्राउंडवर, तर दांडिया रास ४.० एल्प्रो सिटी स्क्वेअर येथे रंगणार आहे. याशिवाय कर्वे नगरमधील पुण्यातील सर्वात मोठ्या दांडिया रात्री, बिबवेवाडीतील रास गरबा दांडिया २K२६, तसेच कोथरूडमधील लोकमत रंगीलो गरबा ३.० हेही आकर्षण ठरणार आहेत. लोकमत रंगीलो गरबा ३.० मध्ये अभिनेता हर्षवर्धन राणे सहभागी होणार आहे.

सॅमसंग गॅलेक्सी टॅब एस12 सिरीजच्या किमती जाहीर

गुरुग्राम - सॅमसंगने आज जाहीर केले की, त्यांची गॅलेक्सी टॅब एस१२ सिरीज ७ ऑक्टोबरपासून भारतात उपलब्ध होईल. ग्रे आणि सिल्व्हर रंगांमध्ये उपलब्ध असणारे गॅलेक्सी टॅब एस१२ अल्ट्रा आणि टॅब एस१२+ अत्यंत सडपातळ डिझाइनमध्ये अभूतपूर्व कार्यक्षमता, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि नवीनतम गॅलेक्सी एआय यांची सांगड घालत सॅमसंगचा आतापर्यंतचा सर्वाधिक सक्षम आणि वैविध्यपूर्ण टॅब्लेट अनुभव देतात.

सरकारच्या पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांचे कौतुक

भुवनेश्वर : ओडिशा सरकारच्या वन, पर्यावरण व हवामान बदल तसेच कामगार व ईएसआय विभागाचे राज्यमंत्री श्री गणेश राम सिंह खुंटिया यांनी देहराडून स्थित वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या तीन वर्षांच्या संशोधन प्रकल्पाचा पहिल्या वर्षाचा अहवाल जारी केला. या संशोधनात सॅटेलाइट टेलिमेट्री, बोटीद्वारे करण्यात आलेले सर्वेक्षण आणि समुद्रकिनाऱ्याच्या अभ्यासाचा वापर करण्यात आला.

मुस्कान बामने दिसणार नव्या अवतारात

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल पुष्पा (करुणा पांडे)च्या प्रवासातील नवी आव्हानं आणि तिच्या कुटुंबाभोवती तसेच तिच्या जवळच्या लोकांभोवती बदलत जाणारी समीकरणं उलगडत राहते. आगामी ट्रॅकमध्ये शनाया (मुस्कान बामने) बापोद्राच्या राजकीय मोहिमेला मदत करण्यासाठी 'शॉन' या पूर्णपणे नव्या अवतारात दिसणार आहे आणि आपली खरी ओळख लपवून ठेवण्यासाठी ती मोठी जोखीम पत्करणार आहे.

"दानवीर कर्ण" घडण्याचा पाया रचला जातो

सोनी सबची हस्तिनापुर के वीर मालिका तरुण पांडव आणि कौरवांच्या जडणघडणीच्या काळाचा मागोवा घेते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे तसेच पुढे ते जे बनतात त्याची पायाभरणी करणारे अनुभव उजेडात आणते. मालिकेतील नवीन पात्र राधे (व्यंकटेश पांडे) आपल्या आजूबाजूच्या लोकांना मदत करण्याच्या नैसर्गिक वृत्तीमुळे विशेष ठरतो. स्वतःकडे असलेलं इतरांसोबत वाटून घेणं असो किंवा गरजूंना मदत करणं असो, राधे दुसऱ्यांच्या आनंदाला आणि हिताला नेहमी स्वतःपेक्षा अधिक महत्त्व देतो. पुढे हाच गुण त्याला 'दानवीर कर्ण' म्हणून ओळख मिळवून देतो.



मांजरांच्या हल्ल्यांतही वाढ; नऊ महिन्यांत 1,833 जणांना चावा

घाटीत दहा महिन्यांत 10,633 श्वानदंशाचे रुग्ण; बिबट्या, माकडे, लांडग्यांसह उंदीर, मुंगूस, डुक्कर, घोड्यांचेही हल्ले

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरासह जिल्ह्यात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांचे सत्र सुरू असतानाच आता मांजरांच्या हल्ल्यांची संख्याही चिंताजनकपणे वाढली आहे. घाटी रुग्णालयातील नोंदीनुसार जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत तब्बल १,८३३ जणांना मांजरांनी चावा घेतला, तर जानेवारी ते ऑक्टोबरदरम्यान १०,६३३ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याने उपचारासाठी घाटीत यावे लागले. विशेष म्हणजे बिबट्या, माकड, लांडगा यांसारख्या जंगली प्राण्यांसह उंदीर, मुंगूस, पाल, डुक्कर आणि घोड्यांच्या हल्ल्यांतील रुग्णांचीही नोंद होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घाटीतील वार्ड क्रमांक १० मध्ये प्राणीहल्ल्यांनंतर उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची नोंद केली जाते. त्यानुसार जानेवारीत १,३४७ श्वानदंश आणि २०६ मांजरदंश, फेब्रुवारीत १,१७४ श्वानदंश आणि २०८ मांजरदंश, मार्चमध्ये १,२८४ श्वानदंश आणि १९० मांजरदंश नोंदविण्यात आले.

एप्रिलमध्ये १,१४९ कुत्रे आणि १७९ मांजरे, मेमध्ये १,२०० कुत्रे आणि १८३ मांजरे, जूनमध्ये १,१३४ कुत्रे आणि २३४ मांजरे, जुलैमध्ये



१,०७५ कुत्रे आणि २१७ मांजरे, ऑगस्टमध्ये १,१४४ कुत्रे आणि २३५ मांजरे, तर सप्टेंबरमध्ये १,१३६ कुत्रे आणि १८१ मांजरे यांच्या हल्ल्यांची नोंद झाली.

जंगली प्राण्यांकडूनही धोका

नैसर्गिक अधिवासात होणारे बदल, जंगलतोड आणि मानवी वस्त्यांचा वाढता विस्तार यामुळे जंगली प्राण्यांचा मानवी वस्त्यांशी संपर्क वाढत आहे. बिबट्या, लांडगा आणि माकडांच्या हल्ल्यांबरोबरच उंदीर, मुंगूस, पाल, डुक्कर आणि घोड्यांच्या हल्ल्यांतील नागरिकही घाटीत उपचारासाठी दाखल होत आहेत. त्यामुळे केवळ भटक्या कुत्र्यांचाच नव्हे, तर विविध प्राण्यांपासून नागरिकांना धोका निर्माण झाला आहे.

घाटीत १० हजार अँटी रेबीज इंजेक्शनचा साठा

प्राणी चावल्यानंतर रेबीजचा धोका लक्षात घेऊन घाटीत उपचाराची व्यवस्था करण्यात आली आहे. घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या पुढाकाराने रुग्णालयात १० हजार अँटी रेबीज इंजेक्शनचा साठा उपलब्ध करण्यात आला आहे. दररोज सुमारे ३५ ते ४० रुग्णांना या लसीचा लाभ मिळत आहे. त्यामुळे प्राण्याने चावा घेतल्यानंतर जखम किरकोळ असल्याचे समजून दुर्लक्ष न करता तत्काळ वैद्यकीय उपचार घेणे गरजेचे आहे.

अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली हँडबॉलच्या संविधानात मोठी सुधारणा

विशेष सर्वसाधारण सभेत घटनादुरुस्तीला मंजुरी; पारदर्शक व खेळाडूकेंद्रित प्रशासनावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : हँडबॉल असोसिएशन महाराष्ट्राच्या (HAM) संविधानात भारतीय हँडबॉल महासंघाच्या संविधानाशी सुसंगत तसेच नवीन क्रीडा संहितेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. संघटनेचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्तावित घटनादुरुस्तीला मंजुरी देण्यात आली.

संघटनेच्या प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व, शिस्तबद्धता आणि कार्यक्षमतेला अधिक बळ देण्याच्या उद्देशाने संविधानातील सुधारणांचा मसुदा सचिव रणधीर सिंह यांनी सभेसमोर मांडला. यावर महाराष्ट्रातील



विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व प्रतिनिधींनी सविस्तर चर्चा करून सूचना व मते मांडली. सर्व सूचनांचा विचार केल्यानंतर प्रस्तावित सुधारणांना सभेने एकमताने मंजुरी दिली.

यावेळी मार्गदर्शन करताना अतुल सावे यांनी संघटनेतील एकजूट आणि पारदर्शक प्रशासनासोबतच खेळाडूकेंद्रित कार्यपद्धतीला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. महाराष्ट्रातील हँडबॉलचा सर्वांगीण विकास, खेळाडूंना अधिकाधिक संधी आणि राज्यातील संघटनात्मक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्व पदाधिकारी व जिल्हा संघटनांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. या घटनादुरुस्तीमुळे हँडबॉल असोसिएशन महाराष्ट्राच्या प्रशासनाला आधुनिक, पारदर्शक आणि अधिक उत्तरदायी स्वरूप मिळण्यास मदत होणार असून, राज्यातील हँडबॉलच्या भविष्यातील विकासाला संस्थात्मक बळ मिळणार आहे.

सभेस सचिव रणधीर सिंह, सहसचिव पंकज भारसाखळे, कोषाध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त सतीश धोंडगे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार श्रीकांत जोशी, स्टीयरिंग कमिटीचे अध्यक्ष अजिंक्य सावे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

रेल्वेचे नियम मोडल्यास भरावा लागणार इतका दंड

मुंबई: रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाची बातमी आहे. विनातिकिट, बनावट तिकिट, दुसऱ्यांचा पास वापरून प्रवास करणाऱ्यांवर आता रेल्वेकडून कारवाई केली जाणार आहे. अनेक वेगवेगळे गुन्हे किंवा अनधिकृत कृत्ये केल्यावर सुद्धा रेल्वेकडून प्रवाशांवर कारवाई केली जाणार आहे. ऑक्टोबर महिन्यामध्ये रेल्वेकडून तिकिट तपासणाऱ्याला पास किंवा तिकिटासोबत आपलं ओळखपत्र दाखवणं सुद्धा अनिवार्य असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानंतर आता प्रवाशांनी कोणकोणते गुन्हे केल्यावर किती दंड भरावा लागणार आहे. बनावट तिकिटाने प्रवास करणाऱ्यांवर कलम 137 अन्वये, प्रवाशाकडून भाडे आणि अतिरिक्त शुल्क (किमान 500रू.) दंड म्हणून आकारला जाणार आहे. विनातिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कलम 138 अन्वये, अतिरिक्त शुल्क (किमान 500रू.) दंड म्हणून प्रवाशाकडून आकारला जाणार आहे. दुसऱ्यांच्या पासवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कलम 142 अन्वये, प्रवाशाकडून भाडे आणि अतिरिक्त शुल्क (किमान 500रू.) दंड म्हणून आकारला जाणार आहे.

परवाना शिवाय फेरीवाला, विक्री करणे किंवा भिक मागणाऱ्याला कलम 144 अन्वये ₹ 2000/-चा दंड

गोंधळ घालणे, मद्यपान करून बडबड करणे किंवा अश्लील भाषा वापरणाऱ्या प्रवाशावर कलम 145 अन्वये ₹ 1000/-चा दंड

रेल्वे कर्मचाऱ्याच्या कामामध्ये अडथळा आणणाऱ्यावर कलम 146 अन्वये ₹ 2500/-चा दंड आदी.

विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवार जाहीर

मुंबई : पुणे शिक्षक मतदारसंघातील महायुतीमधील जागावाटपाचा तिढा अखेर सुटला आहे. यानंतर भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीने महाराष्ट्रात होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. भाजपने पुणे आणि नागपूर विभागातील उमेदवारांची घोषणा केली आहे. पुणे विभागीय पदवीधर मतदारसंघातून डॉ. स्मिता योगेश जाधव यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे. तर नागपूर विभागातून सुधाकर विठ्ठलराव कोहळे यांना पक्षाने तिकीट जाहीर केले आहे. याशिवाय पुणे विभागातून कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना उमेदवारी मिळाली आहे. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या 3 पदवीधर आणि 2 शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी



23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार असून 27 ऑक्टोबरला मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे. निवडणुकीची अधिसूचना 29 सप्टेंबर 2026 रोजी जारी करण्यात आली. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख 6 ऑक्टोबर असून 7 ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 9 ऑक्टोबर आहे. त्यानंतर 23 ऑक्टोबरला सकाळी 8 ते दुपारी 4 या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदानानंतर 27 ऑक्टोबर रोजी मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल.

एन ए आदेशाचा गैरवापर करून प्लॉट विक्री करणाऱ्या वर पाथरी पोलिसात गुन्हा दाखल

चाळीस आर जमिनीवर विनापरवानगी प्लॉटिंगची विक्री; पाथरी न.प.ची फसवणूक केल्याचा आरोप

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

परभणी:- परभणी जिल्ह्यातील पाथरी पाथरी येथील शहरातील माळीवाडा भागातील एका सिटी मधील एक एकर जमिनीचे बिगर शेती (एन ए) आदेशाची परवानगी न घेताच नगरपरिषदेची पूर्व परवानगी व लेआउट मंजुरीने घेतात प्लॉटिंगची विक्री केल्या प्रकरणीनगरपरिषदे कडून पाथरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणात एनए आदेशाचा कथित गैरवापर करून पात्री नगरपरिषद तसेच दुय्यम निबंध कार्यालयाची फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे याप्रकरणी शनिवारी रात्री अब्दुल रचित अब्दुल हमीद अन्सारी यांच्यासह इतर आरोपी विरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की नगरपरिषद पाथरीचे स्वच्छता निरीक्षक सुभाष सोपान लांडगे यांनी दिनांक 3 ऑक्टोबर शनिवार रोजी पात्री पोलीस ठाण्यात ही तक्रार दिली आहे यामध्ये पाथरी नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी यांच्या 22 सप्टेंबर 2026 रोजी च्या आदेशानुसार त्यांना या प्रकरणात कायदेशीर तक्रार दाखल करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले होते त्याप्रमाणे तक्रारीनुसार माळीवाडा येथील सिटी सर्वे नंबर 79 ची एकूण जमीन 2.92 हेक्टर असूनत्यापैकी 2.51हेक्टर क्षेत्रफळासाठी तात्कालीन परभणी जिल्हाधिकारी यांनी दिनांक 28 नोव्हेंबर 2007 रोजी यांनी मंजूर केला होता उर्वरित 40 आर स्वातंत्र्य एन ए रूपांतर न करता व तसेच नगरपरिषेकडून ना हरकत प्रमाणपत्र व लेआउट मंजुरीने घेताच प्लॉटिंग विक्री सुरू केली असा आरोप करण्यात आला आहे यामध्ये प्रकाश पामे यांच्या नावावर असलेल्या एन ए आदेशाचा कथीतरीत्या गैरवापर करण्यात आल्याचे नगर परिषदेच्या तक्रारीत म्हटले आहे याप्रकरणी पात्री नगरपरिषदेकडून 25 मार्च 2026 रोजी 18 जनावर प्लॉट खरेदी विक्री केल्याचा खुलासा सादर करण्याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या परंतु संबंधितांकडून अद्याप कोणताही खुलासा किंवा सदरील तक्रारीत म्हटले आहे नगरपरिषदेच्या मूळ कागदपत्राच्या पाहणीत संबंधित 40आर जमिनीसाठी नगरपरिषदेची परवानगी किंवा घेतल्याचे अजून आले नसल्याचा दावाही करण्यात आला आहे तसेच सन 2009 ते जानेवारी 2023 या कालावधीत दुय्यम निबंधक कार्यालय आणि नगर परिषदेचे कधीच बनावट दस्तावेजाचा वापर करून नामांतर व खरेदी विक्री केल्याच्या नोंदी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे याप्रकरणी अब्दुल रशीद अब्दुल हमीद अन्सारी यांच्यासह संगणमत करून मदत केल्याचा आरोप असलेल्या इतरांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पाथरी पोलीस हे करत आहेत .

राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेला परभणीत उत्साहात सुरुवात

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, परभणी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी तसेच परभणी जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा २०२६-२७ आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा दि. ३ ते ५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, बॅडमिंटन हॉल, परभणी येथे होत आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गणेश माळवे (टेबल टेनिस राज्य कार्यकारिणी सदस्य) स्पर्धेच्या उद्घाटक डॉ. प्रा. माधव शेजूळ, (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त)प्रमुख पाहुणे मंगल पांडे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त) श्रीमती प्रिया दिलीपसिंग ठाकूर,(प्राचार्य



ज्योतिर्गमय इंग्लिश स्कुल, अध्यक्ष लाईन्स क्लब ऑफ फॅमिली) उपस्थित होते. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. कल्याण पोले, मधुकर क्षीरसागर, निवड समिती सदस्य सचिन पुरी, अजय कांबळे, अँड राजकुमार भांबळे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात गणेश माळवे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, "या स्पर्धेत विजय मिळवणे महत्त्वाचे आहेच; परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे प्रामाणिकपणे खेळणे, शिस्त पाळणे आणि आपल्या प्रतिस्पर्ध्याचा सन्मान करणे. विजय मिळाला तर नम्र राहा आणि पराभव झाला तर त्यातून शिकून पुढील सामन्यासाठी अधिक जोमाने तयारी करा." "जिंकताना नम्र राहा आणि हरताना खचू नका," हा खेळाचा संदेश प्रत्येक खेळाडूने आत्मसात करावा, असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या खेळाडूंनी केवळ पदकासाठी नव्हे, तर आपल्या शाळेचे, जिल्ह्याचे आणि पालकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मैदानात उतरावे, असेही त्यांनी सांगितले.

उद्घाटन पर बोलताना डॉ. माधव शेजुळ म्हणाले या स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंमध्ये शिस्त, आत्मविश्वास, खिलाडूवृत्ती आणि नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होईल. टेबल टेनिससारख्या वेगवान खेळातून महाराष्ट्राला भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवंत खेळाडू मिळतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. परभणी जिल्ह्याने टेबल टेनिस खेळात नावलौकीत वाढला आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक व पंचांचे स्वागत करून स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी परभणी जिल्हा हौशी टेबल टेनिस असोसिएशन वतीने आंतरराष्टीय टेबल टेनिस खेळाडू आद्या महेश बाहेती हिस रोख १०,०००/- रू देऊन गौरव करण्यात आला. स्पर्धेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी परिश्रम राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुढे, क्रीड़ा अधिकारी रोहन औढेकर, नागेश कान्हेकर, डी.डी. सोन्नेकर, किशोर ढोके, चेतन मुक्तावर, गजानन तुडमे, भागवत दुधारे, धीरज नाईकवाडे, प्रकाश पंडित, इरफान सौदागर, सुमेध शिंदे योगेश आदमे, आशिष परदेशी, सचिन, इत्यादीनी परिश्रम घेतले.

१७ वर्ष मुले गटात : उपांत्य फेरीत पुणे वि नागपूर, तर नासिक वि अमरावती विभाग दाखल झाले

१७ वर्ष मुली :- मुंबई वि नागपूर तर पुणे वि कोल्हापुर विभाग दाखल पंच प्रमुख मधूकर लोणारे

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

भटक्या श्वानांचा प्रश्न आणि नागरी सुरक्षेचे आव्हान

मुंबईतील शैक्षणिक संस्था, रुग्णालये, रेल्वे स्थानके आणि बस डेपो यांसारख्या गर्दीच्या व संवेदनशील ठिकाणी वावरणाऱ्या भटक्या श्वानांच्या समस्येवर मुंबई महापालिकेने उचललेले पाऊल अत्यंत महत्त्वाचे आणि दिलासादायक आहे. आतापर्यंत भटक्या श्वानांना पकडून त्यांचे केवळ निर्बीजीकरण आणि लसीकरण केले जात असे आणि त्यांना पुन्हा त्याच ठिकाणी नेऊन सोडले जात असे. मात्र, या जुन्या पद्धतीमुळे नागरिक आणि लहान मुलांवरील श्वानांच्या हल्ल्यांचे प्रमाण कमी झाले नव्हते. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालय आणि राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार श्वानांना पकडून कायमस्वरूपी निवारा केंद्रात ठेवण्याचा घेतलेला निर्णय हा नागरी सुरक्षेच्या दृष्टीने एक मोठा दिलासा ठरणार आहे. भटक्या श्वानांची आयुष्यभर काळजी घेणे, त्यांना सुरक्षित निवारा, नियमित आहार, उपचार आणि लसीकरण पुरवणे यासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया मान्यताप्राप्त संस्थेची निवड करण्यात आली आहे. दोन वर्षांसाठी १३.३५ कोटी रुपयांची केलेली ही तरतूद आणि प्रति श्वान दैनंदिन १५५ रुपये खर्चाची योजना कागदावर अत्यंत नियोजनबद्ध दिसते. जीपीएस आधारित नोंदीकरण, फोटो लॉगिंग आणि मोबाईल ॲपद्वारे होणारे डिजिटल सनियंत्रण यामुळे या प्रकल्पात पारदर्शकता राहण्यास मदत होईल. विशेषतः, शाळा, रुग्णालये आणि स्थानक परिसरातून हटवलेल्या श्वानांना पुन्हा त्याच संवेदनशील भागात सोडले जाणार नाही, या स्पष्ट नियमामुळे सर्वसामान्य मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी हीच या योजनेच्या यशाची खरी कसोटी असणार आहे. यापूर्वीही अशा अनेक योजना प्रशासकीय उदासीनता आणि कंत्राटदारांच्या अनास्थेमुळे धूळ खात पडल्याचा अनुभव जनतेला आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत असताना, निवारा केंद्रांमध्ये श्वानांवर योग्य उपचार आणि त्यांची मानवी हक्कांसारखीच प्राण्यांच्या अधिकारांनुसार योग्य काळजी घेतली जात आहे की नाही, यावर महापालिकेचा थेट आणि कडक अंकुश असणे गरजेचे आहे. श्वानांचे कल्याण आणि नागरिकांची सुरक्षितता या दोन्ही बाबींचा समतोल साधत ही योजना केवळ घोषणा न ठरता प्रत्यक्ष भूमीवर यशस्वीपणे राबवली गेली, तरच मुंबईतील भटक्या श्वानांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकेल.

SIR बेकायदेशीर, माझ्या फक्त 2 मागण्या, दिल्लीतही जाऊन बोला...; राज ठाकरे कडाडले

मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत गर्जना मोर्चा काढला. ठाकरे बंधूंच्या या मोर्चाला मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राज्यातील इतर विरोधी पक्षाने देखील ठाकरे बंधूंच्या या गर्जना मोर्चाला उपस्थित राहत पाठिंबा दिला. मेट्रो सिनेमा ते मुंबई महापालिका मुख्यालयापर्यंत ठाकरे बंधूंनी मोर्चा काढला. त्यानंतर राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर हल्लाबोल करत विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

देशभरात मतचोरीमुळे वातावरण तापलंय. मी 2017 पासून सांगतोय, की मतचोरी सुरु आहे. त्यादरम्यान, मी काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांना भेटलो होतो. मी सतत सांगत होतो. मतांमध्ये चोरी होत आहे. त्यावेळी मी निवडणुकांवर बहिष्कार टाका, असं म्हणत होतो, असं राज ठाकरे म्हणाले. मत अशी कमी होऊ शकत नाही. या ठिकाणी सर्व बसलेले नेते देखील त्यावेळी होते, असं राज ठाकरेंनी सांगितले. 2024 च्या निवडणुकीत संपूर्ण बहुमत महायुतीला मिळालं, पण महाराष्ट्रात जल्लोष नाही. लोकांमध्ये उत्साह नाही, जल्लोष नाही. संपूर्ण सन्नाटा होता, मग हा कोणता विजय? 40 ते 60 लाख मतदार वाढवले गेले. लोकसभा आणि विधानसभेत 1 कोटी मत वाढली. तुमची इतकी मत वाढली आता सगळ्या गोष्टी उघड झाल्या.

एकाच उद्योगपतींना जंगलं, प्रकल्प, बंदरे दिले जात आहेत. सरकारचा मनमानी कारभार सुरु आहे. निवडणूक आयोग जर आमच्या बरोबर असेल तर आम्ही कसे ही निवडून येऊ...या देशाची आर्थिक स्थिती बरबाद करू...अमेरिकेला सरेंडर होऊ..तुम्हाला रांगेत उभे करू...पेट्रोल इंधनाचे भाव वाढवू...कोणतीही भीती यांना दिसत नाही आहे. काँग्रेसच्या काळात ही अनेक उद्योगपती होते. पण यांच्या काळात एकच उद्योगपती..अशी टीका राज ठाकरेंनी केली. सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट, निवडणूक आयोग सगळे ताब्यात घ्यायचे. आपण या देशाचा ढाचा बदलत आहोत. या सगळ्याच्या विरोधात हा मोर्चा आहे, असं राज ठाकरेंनी ठणकावले.

विधानसभेच्या वेळेला मतदार वाढवायचे आणि त्यातून सत्ता घ्यायची आणि SIR मधून दोन कोटी मतदार वगळायचे. हे कोण लोक आहेत?, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. माजी केंद्रीय गृहसचिव आर के सिंह यांच्या मते SIR अपवादात्मक परिस्थितीत करता येते. देशात एकाचवेळी Intensive revision करणं बेकायदेशीर आहे. याची कायद्यातच तरतूद नाही, असंही राज ठाकरे म्हणाले. तसेच माझ्या फक्त दोनच मागण्या आहेत. त्यातील पहिली म्हणजे महाराष्ट्रात जो एसआयआर झाला, तो रद्द करावा. तसेच दुसरी मागणी म्हणजे यापुढे बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या पाहिजे. यामुळे दूध का दूध आणि पानी का पानी होईल, असं राज ठाकरे म्हणाले. तसेच माझी सर्व राजकीय पक्षांना विनंती आहे की, दिल्लीत जाऊन बोला. उद्या कोणाची सत्ता येऊ दे... काही फरक पडत नाही. पण सत्ता योग्य मार्गाने आली पाहिजे, असं राज ठाकरे म्हणाले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची जुनी फाईल उघडली

इंजिनीअरने जीवन संपवल्याची नोट, चौकशीचे आदेश

मुंबई : मतदार याद्यांचे पुनरीक्षण (SIR) आणि निवडणूक आयोगाच्या (ECI) कारभारावरून देशभरात राजकीय वाद पेटलेला असतानाच, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. केरळमधील काँग्रेसप्रणीत सरकारने ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात तब्बल 20 वर्षे जुन्या एका प्रकरणात आणि केएसटीपी (KSTP) रस्ते विकास प्रकल्पातील कथित भ्रष्टाचाराप्रकरणी विजिलन्स चौकशीचे आदेश दिले आहेत. हे संपूर्ण प्रकरण 2006 मधील असून, त्याकाळी ज्ञानेश कुमार हे केरळ सरकारच्या लोकनिर्माण विभागात सचिव म्हणून कार्यरत होते. 2006 मध्ये जागतिक बँकेच्या निधीतून 'केएसटीपी' (KSTP) अंतर्गत अंगामाली ते तिरुवनंतपुरमदरम्यान एमसी रोडच्या रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले होते. हे काम 'पती-बेल' या मलेशियन कंपनी आणि भागीरथ इंजिनिअरिंगच्या संयुक्त उपक्रमाला देण्यात आले होते.

बुलेट ट्रेन प्रकल्पाची मोठी झेप : साबरमती नदीवर उभारला 480 मीटर लांब अन् 36 मीटर उंच भव्य पूल

अहमदाबाद : देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन (Mumbai Ahemdabad Bullet Train) प्रकल्पाच्या कामाला वेगाने गती मिळत असून, या प्रकल्पाच्या वाटेतील एक मोठा टप्पा यशस्वीपणे पार पडला आहे. नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (NHSRCL) शनिवारी दिलेल्या माहितीनुसार, गुजरातमधील प्रसिद्ध साबरमती नदीवर ४८० मीटर लांबीचा आणि तब्बल ३६ मीटर उंचीचा अवाढव्य पूल बांधून पूर्ण झाला आहे. हा पूल साधारण १२ मजली इमारतीइतका उंच असून, या कॉरिडॉरमधील मुख्य आणि आव्हानात्मक बांधकामांपैकी एक मानला जात आहे.

रेल्वे मार्गांच्या वरून मार्ग काढण्यासाठी खास रचना

हा पूल पश्चिम रेल्वेच्या अहमदाबाद-दिल्ली मुख्य रेल्वे मार्गाच्या अगदी जवळ आहे. जमिनीपासून सुमारे १४.८ मीटर उंचीवर असलेल्या या पुलाची रचना अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली आहे. साबरमती आणि अहमदाबाद या दोन महत्त्वाच्या बुलेट ट्रेन स्टेशनच्या मध्ये हा पूल येतो. (साबरमती स्टेशनपासून १ किमी तर अहमदाबाद स्टेशनपासून ४ किमी अंतरावर). खाली असलेल्या सध्याच्या रेल्वे



मार्गांना आणि इतर पायाभूत सुविधांना कोणताही अडथळा येऊ नये, म्हणून या पुलाचे खांब (पिलर्स) जास्त उंच ठेवण्यात आले आहेत.

नदीच्या प्रवाहाला धक्का न लावता ८ विशाल खांबांचा आधार

NHSRCL च्या माहितीनुसार, या भव्य पुलाचे वजन पेलण्यासाठी एकूण ८ गोलाकार खांब उभारण्यात आले आहेत. प्रवाहात कमीत कमी अडथळा यावा यासाठी खांबांची मांडणी रणनीतिकदृष्ट्या करण्यात आली आहे. यातील ४ खांब थेट नदीच्या पात्रात, २ खांब नदीच्या दोन्ही तीरांवर, तर उरलेले २ खांब नदीच्या किनाऱ्याबाहेर उभारले गेले आहेत. यामुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहण्यास मदत होणार आहे.

विशेष तंत्रज्ञानाचा वापर करून नक्षीदार अन् भक्कम बांधकाम

नदीतील पाण्याचा प्रवाह आणि खोली लक्षात घेता, या पुलाच्या उभारणीसाठी 'बॅलॅन्स्ड कँटिलीव्हर पद्धत' (Balanced Cantilever Method) वापरण्यात आली आहे. खोल नद्या आणि मोठ्या जलमार्गांवर लांब पूल बांधण्यासाठी हे एक प्रगत तंत्रज्ञान मानले जाते. या तंत्रज्ञानामुळे पुलाच्या खाली तात्पुरते मोठे सांगाडे किंवा मचान उभारण्याची गरज पडत नाही, ज्यामुळे पाण्याचा प्रवाह आणि खालील वाहतूक अडवली जात नाही.

नद्यांवरील २५ पैकी १८ पुलांचे काम पूर्ण

मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल (MAHSR) मार्ग हा अनेक उड्डाणपूल, महामार्ग, रेल्वे लाईन आणि मेट्रो कॉरिडॉरवरून जातो. त्यामुळे संपूर्ण प्रवासात एकूण २५ मोठे नदी पूल बांधले जाणार आहेत. त्यापैकी तब्बल १८ पुलांचे काम आतापर्यंत यशस्वीरीत्या पूर्ण झाले असून, उर्वरित कामेही वेगाने सुरू आहेत.

'महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा 2026'

शेतात राबणाऱ्या हातांना मिळाला 'शेतकरी' म्हणून कायदेशीर दर्जा

मुंबई : राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्रात महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचं पाऊल उचलण्यात आलं आहे. २ ऑक्टोबर २०२६ पशु संपूर्ण राज्यात 'महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा २०२६' अंतर्गत पात्र महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' वाटप करण्याची अधिकृत प्रक्रिया सुरु झाली आहे. या निर्णयामुळे शेतात अहोरात्र कष्ट करणाऱ्या, पण स्वतःच्या नावावर सातबारा अथवा जमिनीची मालकी नसलेल्या लाखो महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत कायदेशीर ओळख मिळाली आहे.

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात जेवढा पुरुषांचा सहभाग आहे तितकाच किंबहुना त्याहून जास्त आहे. पण बहुतांश जमीन ही घरातील पुरुषांच्या नावावर



असल्यामुळे महिलांना शासकीय दप्तरी 'शेतकरी' म्हणून पाहिले जात नव्हते. याचा परिणाम असा की, प्रत्यक्ष काम करूनही त्या विविध सरकारी सवलती, कर्ज आणि अनुदानापासून वंचित राहत असत.

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग पुरुषांच्या बरोबरीने किंवा त्याहून अधिक आहे. मात्र, बहुतांश शेतजमीन ही घरातील पुरुषांच्या (पती, वडील किंवा मुलगा) नावावर असल्यामुळे महिलांना शासकीय दप्तरी 'शेतकरी' मानले जात नव्हते. परिणामी, प्रत्यक्ष काम करूनही त्या विविध सरकारी सवलती, कर्ज आणि अनुदानापासून वंचित राहत असत. राज्य सरकारने या अडथळ्यावर कायमचा तोडला काढला असून नव्या कायद्यानुसार, प्रत्यक्ष शेती, दुग्धव्यवसाय, पशुपालन किंवा मत्स्यपालन यांसारख्या शेती संबंधित व्यवसायात सक्रिय असणाऱ्या महिलांच्या नावावर जमीन नसली तरी त्यांना स्वतंत्र महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्यात येईल.

या योजनेची अंमलबजावणी सुरळीत आणि पारदर्शक होण्यासाठी सरकारने विशेष डिजिटल महिला पोर्टल व डेटाबेस तयार केला आहे. गावातील कोणत्या महिला शेतीत किंवा पूरक व्यवसायात कार्यरत आहेत, त्यांचे सर्वेक्षण करण्याची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतींवर सोपवण्यात आली आहे. ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या पडताळणीनंतर तसेच ग्रामसभेच्या मान्यतेनंतर डिजिटल प्रमाणपत्र थेट लाभार्थींच्या मोबाईलवर उपलब्ध करून दिले जात आहे. हे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर महिलांना कोणत्याही बँकेतून स्वतःच्या नावावर शेती किंवा शेतीपूरक व्यवसायासाठी अत्यंत कमी व्याजदरात कर्ज मिळवू शकतील.

नैसर्गिक आपत्ती किंवा दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झाल्यास विम्याची व मदतीची रक्कम थेट महिला शेतकऱ्याच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा होईल. ट्रॅक्टर, ठिबक सिंचन, खते-बियाणे आणि शेती अवजारांवर मिळणारे शासकीय अनुदान आता पुरुषांच्या संमतीशिवाय किंवा सहकार्याशिवाय महिलांना थेट प्राप्त करता येईल.

देशामध्ये हुकूमशाह बनत असेल तर त्याला इथेच गाडणार; गर्जना मोर्चात उद्धव ठाकरेंचा घणाघात, म्हणाले, ज्ञानेश कुमार हे त्यांचे हत्यार!

मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कारभाराविरोधात आणि लोकशाही तथा संविधानाच्या रक्षणासाठी आज मुंबईत 'गर्जना मोर्चाचे' (Garjana Morcha) आयोजन करण्यात आले. या मोर्चात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) आणि मनसे प्रमुख राज ठाकरे (Raj Thackeray) यांनी एकत्र येत केंद्र सरकार आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या धोरणांवर सडकून टीका केली.

उद्धव ठाकरे म्हणाले की, हा लढा कोणत्याही एका पक्षाचा, व्यक्तीचा, जातपात, धर्माचा नाही, हा लढा आपल्या स्वातंत्र्याचा लढा आहे. पहिल्यांदा मोदी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी 'मेक इन इंडिया' अशी घोषणा दिली होती. आम्हाला मान्य आहे, पण त्यामध्ये हुकूमशाह देखील आपल्या देशात बनत असेल तर त्याला या देशातच गाडून टाकण्यासाठी आज आम्ही उभे राहिलेलो आहोत.

संपूर्ण देशात 13 कोटी मतदार वगळले

यानंतर राज ठाकरेंनी सांगितलेल्या मतदारांच्या आकडेवारीचा संदर्भ देत उद्धव ठाकरे यांनी निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. राज यांनी सांगितले की, आपल्या राज्यातील दोन कोटी मतदार वगळले गेले. संपूर्ण देशात 13 कोटी मतदार अचानक या लोकांनी वगळून टाकले. म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राची लोकसंख्या यांनी देशाच्या मतदार यादीतून वगळून टाकली, हे मान्य आहे का तुम्हाला? बंगाल, तामिळनाडूमध्ये वगळले. तामिळनाडूमध्ये 70 लाख, बंगालमध्ये 30 लाख. विशेष म्हणजे बंगालमध्ये जे मतदार वगळले गेले, सार्वत्रिक निवडणुकीत त्यातले काही वैध झालेत. आता तिकडे पोटनिवडणूक आहे. या मतदारांना पोटनिवडणुकीमध्ये मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून तात्काळ सुनावणीसाठी यांचे अर्ज सुप्रीम कोर्टात गेले. तेव्हा सुप्रीम कोर्टाने तात्काळ उत्तर दिले की, ऐकू ना. ही निवडणूक परवा 6 तारखेला होत आहे आणि सुप्रीम कोर्टाने सांगितले, फक्त पोटनिवडणूक आहे, आम्ही 5 तारखेला सुनावणी घेऊ. उद्या सुनावणी घेणार आहे की नाही, अजूनदेखील ठरलेले नाही. जर निर्णय हो दिला, तर परवाच्या निवडणुकीत हे मतदार मतदान करू शकणार आहेत का? याचा अर्थ यांनी सर्व संस्था आपल्या सोबत घेतल्या आहेत.

ज्ञानेश कुमार यांची नेमणूक ही पक्षपातीपणाने

यापूर्वी निवडणूक आयुक्त नेमले जाताना, पहिला माझा आक्षेप या नेमणुकीलाच आहे. जो आयुक्त संपूर्ण देशाच्या निवडणुकीवर लक्ष ठेवतो, आमच्या देशाच्या राष्ट्रपतींची निवडणूक होते, पण निवडणूक आयुक्तांची निवडणूक होत नाही. नेमणूक कशी होते? पूर्वी त्या कमिटीमध्ये सरन्यायाधीश होते, पंतप्रधान होते आणि विरोधी पक्षनेते होते. या लोकांनी बरोबर सरन्यायाधीश काढून टाकले, विरोधी पक्षनेता ठेवला आणि सरन्यायाधीशांच्या जागी पंतप्रधान म्हणतील तो मंत्री टाकला. म्हणजे कोण तर अमित शाह. राहुल गांधींनी असहमती दर्शवली. त्यांनी सांगितलं, कोर्टामध्ये केस आहे, तोपर्यंत थांबा. पण हे निर्णय घेऊन मोकळे झाले, ज्ञानेश्वर कुमारांना नेमून मोकळे झाले. मग तुमच्यासमोर प्रश्न असेल, त्या कोर्टाच्या सुनावणीचे काय झाले? सुनावणी मागून सुनावणी, अजून बतावणी होतच नाहीये. त्यावेळेला जी सुनावणी सुरू झाली, त्याला अद्याप तारीख मिळत नाही. ज्ञानेश कुमार यांची नेमणूक ही पक्षपातीपणाने केली आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

भारतीय जनता पक्षाला सरकार चालवता येत नाही

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, जोपर्यंत काँग्रेसचं सरकार होतं, तोपर्यंत आपण देखील भाजपसोबत वाहत गेलो होतो. मग त्यांनी काँग्रेस एवढा भ्रष्ट सरकार नाही, असं वातावरण केलं. पण आता संपूर्ण इंडिया उभा राहिलेला आहे, इंडिया अगेन्स्ट व्होट चोर. 13 कोटी मतदान तुम्ही अचानक गाळत आहात. बंगालमध्ये आतापर्यंत अवैध ठरलेल्या अर्जांची छाननी झाली, त्यातल्या काही लोकांना वैध ठरवले गेले आणि ती सुनावणी तिकडे सुरू आहे, पण उरलेल्या मतदारांची छाननी होऊन तो निकाल किंवा तपास पूर्ण व्हायला जवळपास 146 महिने लागतील. हे प्रकरण इथपर्यंत थांबत नाही. भारतीय जनता पक्षाला सरकार चालवता येत नाही. प्रशासन आणि भाजप हे दोन विरुद्धार्थी शब्द आहेत. ज्या पद्धतीने तुम्ही सरकार चालवत आहात, त्याला सरकार चालवणे नव्हे, तर सूड उगवणे म्हणतात, अशी टीका त्यांनी केली.

तुम्हाला उद्या रस्त्यावर फिरणे मुश्किल होईल

काल परवा ठाण्यात आमच्या पूर्णेकर यांची हत्या झाली. तिथले पोलीस काय झक मारत आहेत का? गृहमंत्री कुठे आहेत? देशभर महिला अत्याचाराच्या गोष्टी ऐकू येत आहेत. कुठे आहे तुमचे हिंदुत्ववादी सरकार? हेच तुमचे हिंदुत्व का? ज्ञानेश कुमार हे त्यांचे हत्यार आहे. मतदानाचा अधिकार हे लोक काढून घेत आहेत. या संस्था तुम्ही ताब्यात घेतल्या असतील, प्रशासन तुम्ही ताब्यात घेतले असेल, पण हे रस्ते जनतेच्या मालकीचे आहेत. या रस्त्यावर उद्या तुम्हाला फिरणे मुश्किल होईल, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी सरकारला दिला.


छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बेकायदा पाणी उपशावर कडक कारवाई करा. जिल्हाधिकारी विनय गौडा

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांवरील अनधिकृत उपसा रोखण्यासाठी तालुकानिहाय समित्या स्थापन करून; वीज तोडण्याचेही आदेश (. खुलताबाद तालुक्यातील येसगाव येथील धरणातून खुलताबाद शहरासह वीस गावांना पाणीपुरवठा होतो . फुलंब्री शहरासह पाच गावांना या ठिकाणाहून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असून धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे . याबाबत खुलताबाद शहरातील लोकप्रतिनिधींनी तहसीलदार यांना निवेदन दिलेले आहे.)

यंदा पर्जन्यमान कमी झाल्याने जिल्ह्याभरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. उपलब्ध जलसाठ्यातून नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विनय गौडा यांनी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. उपलब्ध जलसाठ्यातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प तसेच बंधाऱ्यांमधील उपलब्ध पाण्यावर अनेक ठिकाणी अवलंबित्व आहे. मात्र, या प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रातून अनधिकृतपणे पाणी उपसा करून सिंचनासाठी वापर होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने त्यावर नियंत्रण



आणण्याचा निर्णय घेतला आहे.

अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र संयुक्त पथक स्थापन करण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या पथकात तहसीलदार, गटविकास अधिकारी, महावितरणचे अधिकारी, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कृषी अधिकारी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी आणि पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या पथकाने तालुक्यातील पाटबंधारे प्रकल्पांची पाहणी करून अनधिकृत उपसा होत आहे का, याची तपासणी करायची आहे. अनधिकृत पाणी उपसा आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याबरोबरच पाणी उपसा करणाऱ्या विहिरीवरील वीज कनेक्शन तोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच अनधिकृत उपसा करणाऱ्या व्यक्तींविरोधात नियमानुसार कारवाई करण्याचे मोटर पंप जप्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी विहिरी अथवा अन्य जलस्रोतांमधून आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध करून देण्याबाबतही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र भूजल अधिनियम 2009 मधील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या परिसरातील अनधिकृत वीज जोडण्या तात्काळ बंद करून नियमानुसार कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर सोपविण्यात आली आहे. तसेच ज्या प्रकल्पांमध्ये अत्यल्प पाणीसाठा आहे, त्या परिसरात कोणत्याही शेतकऱ्यास सिंचनासाठी नवीन विद्युत जोडणी देऊ नये, असेही आदेशात नमूद आहे. या सर्व सूचनांचे तातडीने पालन करण्याचे निर्देश एकापात्राद्वारे दि ३ ऑक्टोंबर रोजी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

राज्याप्रमाणे 33 जातींना केंद्रात ओबीसी आरक्षण मिळावे - श्रावण फरकाडे

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



उरण /रायगड / महाराष्ट्र राज्यात ३३ जातींना ओबीसी आरक्षण आहे मात्र त्याच ३३ जातींना केंद्रात आरक्षण नाही त्यामुळे केंद्रात समावेश न झालेल्या या ३३ जातींचे खूप मोठे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक नुकसान होत आहे. गेली अनेक वर्षे ओबीसी महाराष्ट्र कृती समितीच्या माध्यमातून ३३ जातींना महाराष्ट्र राज्याप्रमाणे केंद्र सरकारनेही ओबीसी आरक्षण द्यावे यासाठी कायदेशीर व शांततेच्या मार्गाने लढा सुरु आहे. शासन दरबारी पत्रव्यवहार सुरु आहेत. विविध सर्वच पक्षाचे मंत्री, खासदार आमदार यांच्याही गाठी भेटी घेतल्या. मात्र गेली अनेक वर्षे हा प्रश्न सुटत नसल्याने आता निर्णायक भूमिके पर्यत हा लढा पोहोचला असून जर ओबीसी महाराष्ट्र कृती समितीने केलेल्या मागण्या मान्य झाली नाही तर आगामी होणाऱ्या विधानसभा व लोकसभा निवडणुका लक्षात घेता तीव्र आंदोलन करण्यात येईल. होणाऱ्या परिणामास शासन पूर्णपणे जबाबदार राहील असा आक्रमक इशारा ओबीसी महाराष्ट्र कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे यांनी उरण येथे दिला.

महाराष्ट्रातील ३३ ओबीसी जाती/समाज समूहांचा केंद्र सरकारच्या केंद्रीय ओबीसी सूचीमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र ओबीसी कृती समितीची कार्यकारणी बैठक रविवार, दि.४ ऑक्टोबर २०२६ रोजी आनंदी हॉटेल, कोटनाका-उरण, जिल्हा रायगड येथे कराडी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.यावेळी अध्यक्ष श्रावण फरकाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गरज पडल्यास न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल यासाठी सर्व ३३ जातीनी एकत्र यावे. एकत्र लढा उभारावा असे आवाहन त्यांनी समाजाला केले. यावेळी व्यासपीठावर अंबाला लोकसभा (हरियाणा)चे खासदार अमन कुमार नागरा, भाजपा कार्यकर्ता नवी दिल्ली - श्रीमती पुष्पाजी नागरा, ओबीसी महाराष्ट्र कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे, कार्याध्यक्ष - राम खरपूरिया लोधी, सचिव दिपक नेवे,संरक्षक -नामदेव राऊत, माजी प्राचार्य पी आर बडगुजर, लेवे गुजर समाजाचे जी एम पाटील,प्रा. शालिक नेवारे, ऍड मदन गोवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्रातील संबंधित ओबीसी समाजांना केंद्र सरकारच्या ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याचा आढावा घेण्यात आला.या बैठकीत केंद्र व राज्य सरकारकडे करण्यात आलेले निवेदने, बैठका, पत्रव्यवहार तसेच पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात करण्यात आली. विशेषतः केंद्रीय ओबीसी सूचीतील समावेशाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात नेण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रभावीपणे पाठपुरावा करणे, तसेच या विषयाबाबत विविध ओबीसी समाज संघटनांमध्ये व्यापक जनजागृती करण्यासाठी पुढील दिशा निश्चित करण्यात आली.महाराष्ट्र ओबीसी कृती समितीच्या माध्यमातून या विषयासाठी दिल्ली तसेच महाराष्ट्रात विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. संबंधित समाजांना केंद्र शासनाच्या शैक्षणिक प्रवेश, केंद्रीय सरकारी नोकऱ्या, शिष्यवृत्ती व इतर केंद्रस्तरीय योजनांमध्ये उपलब्ध होणाऱ्या ओबीसी सुविधांचा लाभ मिळावा, हा या प्रयत्नांचा प्रमुख उद्देश आहे.असे यावेळी श्रावण फरकाडे यांनी सांगितले. खासदार अमन कुमार नागरा यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन करताना मी ओबीसी समाजाच्या पाठीशी आहे असे सांगत त्यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. दिल्ली मधील मंत्री व विविध विभागात सचिव यांचीही भेट घडवून देऊ व समाजाचे प्रश्न मार्गी लावू असे त्यांनी सांगितले.या प्रसंगी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.या कार्यकारणी बैठकीस महाराष्ट्रातील विविध ओबीसी समाजांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी कराडी समाजाच्या वतीने भोजनाचेही व्यवस्था करण्यात आली होती. सदर बैठकीचे उत्तम असे नियोजन व आयोजन केल्याने उपस्थित सर्वांनी आयोजकांचे कौतुक केले.सदर कार्यक्रमाचे सुंदर व उत्तम असे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक नितेश पंडित यांनी केले.

सदर बैठक यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र अध्यक्ष महादेव बंडा,सचिव विलास पाटील,माजी अध्यक्ष ऍड. मदन गोवारी,पनवेल तालुका अध्यक्ष सूरदास गोवारी,खजिनदार मधुकर भगत,सह खजिनदार प्रल्हाद कासकर,पनवेल सचिव शिवदास पाटील,उरण अध्यक्ष रमण कासकर,सल्लागार शंकर भोईर,सभापती गणेश पाटील, सदस्य नरेश भोईर,हरिश्चंद्र पाटील,सुनील पाटील, आनंदी हॉटेलचे मालक चेतन भोईर तसेच कराडी समाज संघटनेच्या सर्व पदाधिकारी, सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

वन्यजीव संरक्षणासाठी विद्यार्थ्यांना कृतीची हाक; वन्यजीव सप्ताहात संरक्षणाचा संदेश



जिंतूर : येथील ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. वन्यजीव संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि पर्यावरण जागृती हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

प्रमुख पाहुणे मत्स्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. निवृत्ती पोपतवार यांनी वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व व निसर्गाचा समतोल राखण्यात त्यांची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी यंदा पाण्याचे प्रमाण कमी असल्याने वन्यप्राण्यांसमोर पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली. वन्यजीवांसाठी पाणी व आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्याच्या उपायांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. बी. जी. ठाकरे, प्रा. डॉ. आय. एम. शेख, कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब जाधव यांच्यासह प्राध्यापक व बी.एस्सी. प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. ठाकरे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. आय. एम. शेख यांनी मानले.

भारत सरकारच्या पसारा कायद्या अंतर्गत सुरक्षा रक्षक, पदासाठी कायदेशीर भरती सुरु

बिडकीन प्रतिनिधी : सुरक्षा डिपार्टमेंट मधे ६०वर्षा पर्यंत परमैनेंट नौकरी ची सुवर्ण संधी,भारत सरकारच्या सूक्ष्म लघु मंत्रालय उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा कायदा २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक सुशिक्षित तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मानांकनप्राप्त , एस एस सिक्योरिटी प्रा. लिमिटेड आणि एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला महाविद्यालय, करियर गायडन्स अँड प्लेसमेंट सेल, व राष्ट्रीय सेवा योजना, बिडकीन. पैठण. छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने,दि ७ ऑक्टोबर ते १० पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे. भरतीस बेरोजगार युवकांना पर्मनंट नोकरीं दिली जाणार आहे. त्याचबरोबर. सरकारी सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा,सरकारी ESIC द्वारे सम्पूर्ण परिवरास मेडिकल, ग्रॅजुटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड किंवा महाराष्ट्र किमान वेतन नियमाप्रमाणे मिळणार आहे जे१६ हजार ते २४हजार ८ तास ड्यूटी चे मिळेल, व सर्व सूविधा दिल्या जातील. भरती होणाऱ्या तरूणांना पुणे विभाग, छ. संभाजी नगर विभाग, अहिंल्यानगर विभाग मधेच जिथे नौकरी दिली जाणार आहे,ही भरती प्रक्रिया दि.७ ऑक्टोबर ते १० पर्यंत सकाळी ८ ते दुपारी १पर्यंत कला महाविद्यालय बिडकीन. येथे सुरू राहणार आहे. तरी या सुवर्ण संधी चा लाभ जास्तीत जास्त सुशिक्षित तरुणांनी घ्यावा.

भरती साठी :पात्रता १)शिक्षण :युवक हा कमीत कमी१० वी पास असावा. २)वय:किमान १९ वर्ष ते कमाल ४५ वर्ष. ३) उंची:165सेमी पेक्षा जास्त. ४)वजन ४८किलो पेक्षा जास्त. युवक हा शारीरिक आणि मानसिक फिट असावा. भरतीसाठी कागदपत्रे.1)आधार कार्ड झेरॉक्स २) ,10/12वी /ग्रॅज्युशन चे मार्कशीट पैकी 1 झेरॉक्स. ३) पासपोर्ट साईझ २ फोटो घेऊन येणे.४)रेजिस्ट्रेशन फी ५०० रुपये (फक्त निवड होणाऱ्या युवकांसाठी) घेऊन यावे,या भरतीचा जास्तीत जास्त युवकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कॉलेज चे प्राचार्य डॉ. आहेर एन. एन., करियर गायडन्स अँड प्लेसमेंट सेल चे प्रमुख डॉ. गायकवाड आर. जे., राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. ठोकळे एम. एस. तसेच भरती अधिकारी . महेशकुमार सरतापे, यांनी केले आहे अधिक माहिती करिता संपर्क 9552238057/ 8888669598

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना होणार जीवनाशक वस्तूची वाटप खा. संजय जाधव यांनी दिली माहिती


(छाया : उत्तम बोरसुरीकर)

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी:- शिवसेना शिंदे गटातर्फे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी कार्यक्रम राबवला जाणार आहे त्यापैकी सात ऑक्टोबर बुधवार रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम येथे पार पडणार असल्याची माहिती खासदार संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली

मराठवाड्यात पडलेल्या दुष्काळ व दुष्काळ दुसरीकडे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची आत्महत्येचा धडाका चालू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाड्याचा दौरा करत असताना परभणी येथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना एक मदतीचा हात म्हणून शिलाई मशीन सायकल धान्य किट व इतर जीवनावश्यक साहित्याचे वाटप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमास दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे खासदार संजय जाधव यांनी अक्षदा मंगल कार्यालय येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली सदरील पत्रकार परिषदेला जिल्हाप्रमुख आनंद भरोसे विशाल कदम प्रथम महापौर प्रताप देशमुख माजी आमदार हरिभाऊ लहाने महानगर प्रमुख माणिक पौंडे भास्करांना लंगोटे माजी जिल्हाप्रमुख व्यंकट शिंदे नगरसेवक दीपक बारहाते शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शेतकऱ्यांचे साखर कारखान्याकडे असलेले थकीत पैसे पूर्णपणे अदा आगामी गळीत हंगामासाठी कारखानेसुरू करावे अशी मागणी खा. जाधव यांनी केली. व तसेच इतर कारखाने प्रमाणे 3200 प्रमाणे ऊसाला हमीभाव देत असताना परभणीतील कारखान्यानी किमान 2800 रुपये तरी भाव दिला पाहिजे अशी भूमिका ही त्यांनी मांडली.

मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज उचलून त्यातून स्वतःचे घर भरणाऱ्या सोसायटीच्या चेअरमन ची चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करून गुन्हे दाखल करावेत अशी मागणी ही त्यांनी या वेळेस लावून धरली यादरम्यान जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असताना कृषी विभागाने कोट्यावधी रुपयाची औषधे खरेदी केली असून ही खरेदी शासनाच्या पैशाचा दुरुपयोग असल्याचा आरोप खासदार संजय जाधव यांनी केला प्रत्यक्षा मोठ्या प्रमाणावर औषध खरेदी का करण्यात आली? या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली दुष्काळ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन किमान हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत द्यावी तसेच शेतकऱ्यांची छातीत रतन व उसाचा दर जाहीर करावा व कर्ज व्यवहारातील गैरप्रकार तसेच कृषी विभागातील खरेदीची चौकशी करून गुन्हे दाखल करावे अशी मागणी खासदार जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली.

सेवा संकल्प अभियानात १२७ बालकांची मोफत २D इको तपासणी

39 बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया; 25 बालकांचा वैद्यकीय पाठपुरावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : सेवा संकल्प अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील 0 ते 18 वर्षे वयोगटातील संशयित बालकांसाठी एमजीएम रुग्णालयात मोफत 2D इको तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात जिल्ह्यातील शाळा व अंगणवाड्यांमधून तपासणीसाठी निवडलेल्या 127 बालकांची बालहृदयरोगतज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली. यापैकी 39 बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, 25 बालकांचा पुढील वैद्यकीय पाठपुरावा केला जाणार आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले. पुणे येथील बालहृदयरोगतज्ज्ञ डॉ. पंकज सुगावकर यांनी 127 बालकांची 2D इको तपासणी केली. तपासणीमध्ये 39 बालकांना हृदय शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. संबंधित बालकांवर पुढील टप्प्यात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच 25 बालकांना नियमित वैद्यकीय पाठपुराव्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. उर्वरित 63 बालकांची प्रकृती सर्वसाधारण असल्याचे तपासणीत आढळले.

शिबिराला निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बडे तसेच जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी जिल्हा कार्यक्रम समन्वयक विकास मेश्राम, कार्यक्रम सहाय्यक कैलास ताटीकोंडलवार, कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी,औषधनिर्माता, आरोग्य सेविका तसेच एमजीएम रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बालकांमधील हृदयविकारांचे वेळेवर निदान होऊन आवश्यक उपचार व शस्त्रक्रिया उपलब्ध व्हावी, यासाठी सेवा संकल्प अभियानातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा बालकांना मोठा फायदा होत आहे.

करिअरची योग्य दिशा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाची - डॉ.संतोष पडघान

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.४ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव आणि सेवा संकल्प अभियान, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी Career Counselling (करिअर समुपदेशन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध करिअरच्या संधी, योग्य करिअर निवडीची दिशा, स्पर्धा परीक्षा तसेच उच्च शिक्षणाच्या संधी याबाबत मार्गदर्शन मिळावे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, कै. बाबूरावजी काळे महाविद्यालय अजिंठा चे प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा करिअर मार्गदर्शक डॉ. संतोष पडघान, सहयोगी प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना डॉ. संतोष पडघान यांनी विद्यार्थ्यांनी करिअरची निवड करताना केवळ इतरांचे अनुकरण न करता स्वतःची आवड, क्षमता, कौशल्ये आणि भविष्यातील संधी यांचा विचार करावा, असे सांगितले. आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक पात्रतेसोबतच संवादकौशल्य, तंत्रज्ञानाचे ज्ञान, वेळेचे नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास आणि सकारात्मक दृष्टिकोन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच विज्ञान, वाणिज्य, कला, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, संशोधन, अध्यापन, शासकीय सेवा, स्पर्धा परीक्षा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाचे स्पष्ट नियोजन करून त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानामध्ये सातत्याने भर घालणे आवश्यक असल्याचे सांगितले. योग्य वेळी मिळालेले करिअरविषयक मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीला निश्चितच दिशा देऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे यांनीही विद्यार्थ्यांनी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक संधींचा लाभ घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करिअर कट्टा समन्वयक डॉ. मनोज कुमार चोपडे यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत करिअरविषयक विविध प्रश्नांवर मार्गदर्शन घेतले.

दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित या Career Counselling कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या भविष्यातील करिअरची योग्य दिशा निश्चित करण्यासाठी उपयुक्त माहिती व प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांच्या सकारात्मक प्रतिसादाने झाली.


कुशिनारा बुद्ध विहार वडवली येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे तिसरे पर्व मोठ्या उत्साहात संपन्न

'बुद्ध धम्म काल आणि आज' विषयावर आयु. कुंदा खरात यांचे प्रबोधनपर प्रवचन, उपासक उपासिकांची मोठी उपस्थिती

बोरघर माणगांव : *महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्थापित बौद्धजन पंचायत समिती* अंतर्गत बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव यांच्या आदेशान्वये शाखा क्रमांक 10, चार गाव ग्रुप वडवली विभागाच्या वतीने आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिका 2026 चे तिसरे पर्व *माणगाव तालुका शाखा कोषाध्यक्ष / खजिनदार माननीय आयु. सुरेंद्र जाधव साहेब यांच्या अध्यक्षतेखाली तालुका अध्यक्ष माननीय आयु. रवींद्र मोरे, तालुका सचिव माननीय आयु. रघुनाथ साळवी, कायदेशीर सल्लागार मुंबई उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ॲड नरेश जाधव, प्रवचनकार माननीय अरविंद मोरे, खरवली विभाग शाखेचे ऑडिटर संतोष मोरे, शाखा नंबर एक चे सचिव आयु. प्रकाश मोरे, प्रवचनकार आयु. कुंदा राजन खरात मॅडम आणि तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार आयु. उत्तम तांबे, तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार विश्वास गायकवाड.* इत्यादी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाले. मु. वडवली येथील कुशिनारा बुद्ध विहारात रविवारी झालेल्या या सोहळ्यास उपासक उपासिकांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती.

सकाळी 10.30 वाजता आयु. सुधाकर हाटे, आणि आयु. राजेंद्र नामदेव मोरे यांच्या शुभहस्ते धम्म ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर बौद्धाचार्य आयु. लक्ष्मण मोरे, बौद्धाचार्य आयु अनिश येलवे, बौद्धाचार्य विजय पवार यांच्या मंगलमय वाणीतून धम्म संस्कार विधी घेण्यात आला.

सदर कार्यक्रमाला संबोधित करताना माणगाव तालुका अध्यक्ष माननीय रवींद्र मोरे यांनी वर्षावास धम्म प्रवचन मालिका आयोजकांना आणि उपस्थितांना शुभेच्छा देत आगामी वर्षावास कार्यक्रम तसेच भीम चषक क्रिकेट सामने, शतकमहोत्सवी मनुस्मृति दहन दिन, 20 मार्च चवदार तळे सत्याग्रह दिन या कार्यक्रमास सहकार्य,उपस्थिती आणि त्या अनुषंगाने बौद्धजन पंचायत समितीच्या माध्यमातून काढण्यात येणाऱ्या दिनदर्शिका



आणि स्मरणिकेत आपल्या व्यवसायाची, उद्योगाची , शाखेची, संस्थेची किंवा वैयक्तिक स्वरूपाची जाहिरात देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले.

तद्नंतर *'बुद्ध धम्म काल आणि आज' या विषयावर प्रबोधन :* दुपारी 12 ते 1 या वेळेत आयुष्मती कुंदा राजन खरात (मॅडम) यांनी 'बुद्ध धम्म काल आणि आज' या विषयावर ओजस्वी धम्म प्रवचन दिले. तथागत बुद्धांच्या शिकवणीचे आजच्या काळातील महत्त्व, पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला धम्ममार्ग यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित उपासकांनी शांतचित्ताने प्रवचन श्रवण केले. तद्नंतर आयोजकांच्या माध्यमातून उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. सिद्धार्थ मोरे आणि आयु. नरेश साळवे यांनी केले, आभार प्रदर्शनानंतर आयु. संदीप तुकाराम मोरे यांच्या सौजन्याने देण्यात आलेल्या भोजन दान स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुंबई अध्यक्ष सुरेश मोरे, उपाध्यक्ष रुपेश जाधव, सचिव प्रकाश मोरे, खजिनदार गौतम साळवी, निलेश जाधव, स्थानिक अध्यक्ष संजय जाधव, उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव भागवत मोरे, खजिनदार युवराज मोरे, संघमित्रा महिला मंडळ व भीम इलेव्हन क्रिकेट संघ वडवली. आणि आजी माजी पदाधिकारी सभासद सदस्य. तारणे बौद्धवाडी स्थानिक अध्यक्ष यशवंत शिर्के, उपाध्यक्ष नरेश साळवे, सचिव निकेश साळवे, खजिनदार सुशील साळवे, मुंबई अध्यक्ष सचिन शिर्के, उपाध्यक्ष प्रवीण लोखंडे, सचिव राहुल महाडिक, खजिनदार प्रमोद खैरे, प्राजक्ता महिला मंडळ व शिल्पकार क्रिकेट संघ तारणे, आणि आजी माजी पदाधिकारी सभासद सदस्य. शिरवली आत्माराम बौद्धवाडी विकास मंडळ अध्यक्ष किर्तिराज शिर्के, सचिव सुरेंद्र जाधव, खजिनदार आदित्य जाधव आणि सर्व आजी माजी पदाधिकारी सभासद सदस्य इत्यादींचे बहुमोल सहकार्य लाभले.

शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या उपासक उपासिकांच्या उपस्थितीने संपूर्ण परिसर धम्ममय झाला होता.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

प्रतिबंधित प्लॅस्टिकचा 1,390 किलो साठा जप्त

जनता किराणाला 25 हजारांचा दंड; दोन लाखांहून अधिक कॅरीबॅग ताब्यात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधात महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने धडक मोहीम तीव्र केली असून, सिल्क मिल कॉलनी, रेल्वे स्टेशन परिसरातील जनता किराणा दुकानावर कारवाई करून तब्बल १ हजार ३९० किलोपेक्षा अधिक प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले. या साठ्यात दोन लाखांहून अधिक कॅरीबॅग आढळून आल्या. जप्त केलेल्या प्लॅस्टिकची किंमत चार लाख रुपयांपेक्षा अधिक असून, संबंधित दुकानाला २५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला.



महापालिकेच्या पथकाने अचानक केलेल्या तपासणीत दुकानात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लॅस्टिकचा साठा आढळला. कारवाईनंतर संपूर्ण साठा ताब्यात घेण्यात आला. प्रतिबंधित प्लॅस्टिकचा केवळ वापर करणाऱ्यांवरच नव्हे, तर त्याचा साठा, विक्री, पुरवठा आणि वितरण करणाऱ्यांवरही कारवाई करण्याची भूमिका महापालिकेने घेतली आहे.

शहरात प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत आतापर्यंत ४० टनांहून अधिक प्लॅस्टिक जप्त करण्यात आले आहे. नाले-गटारे तुंबणे, पाणी साचणे आणि पर्यावरणीय समस्या निर्माण होण्यास प्रतिबंधित प्लॅस्टिक कारणीभूत ठरत असल्याने मनपाने कारवाईची तीव्रता वाढवली आहे. माहिती मिळाल्यानंतर संबंधित ठिकाणी अचानक तपासणी करून मोठा साठा आढळल्यास तातडीने जप्ती आणि दंडात्मक कारवाई केली जात आहे. ही कारवाई आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशाने आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नागरिक मित्र पथकातील देविदास सुसर, सुवर्णसिंग परदेशी, बालाजी साबळे, नारायण फुके, रावसाहेब विधाते, किसन निकम, संतोष बनकर, दौलत म्हस्के, अरुण काकरवल, गौतम वानखेडे, तसेच स्वच्छता निरीक्षक प्रवीण राठोड, आनंद तांबे व अन्य कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

कारवाई आणखी तीव्र होणार

शहर प्रतिबंधित प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी महापालिकेने 'शून्य सहनशीलता' धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे प्रतिबंधित प्लॅस्टिकचा साठा, विक्री किंवा वापर करणाऱ्यांवर यापुढेही दंडात्मक तसेच आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

नशामुक्त भारतासाठी युवकांची पदयात्रा; 'व्यसनाला नकार, जीवनाला स्वीकार'चा संदेश

बीबी का मकबऱ्यापासून विद्यापीठ गेटपर्यंत जनजागृती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' या संकल्पनेतून युवकांनी रविवारी (४) पदयात्रा काढत नशामुक्त आणि विकसित भारताचा संदेश दिला. माय भारत आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पदयात्रेला बीबी का मकबरा येथून सुरुवात झाली. विविध घोषणा देत युवकांनी नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती केली. विद्यापीठ गेट येथे पदयात्रेचा समारोप झाला.



जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विविध शासकीय विभागांचे अधिकारी, पोलीस अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रतिनिधी, महाविद्यालयीन प्राध्यापक, विद्यार्थी तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून उपस्थितांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी व्यसनमुक्तीचा संदेश देणारे पथनाट्यही सादर करण्यात आले. सहायक पोलीस आयुक्त मझर सय्यद, सहायक पोलीस निरीक्षक सचिन जाधव, फौजदार उत्तरेश्वर मुंढे, सहायक फौजदार रोहनकार, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, नाशिकचे जिल्हा युवा अधिकारी अभिलाष म्हस्के, अहिल्यानगरचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजित संतोष, अंकृती फाउंडेशनच्या रूपा धोका, एनसीसीचे ब्रिजेश कुमार, पीईएस इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य पंडित फुलझेले तसेच एनसीसीचे राकेश कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीबी का मकबरा येथून सुरू झालेल्या पदयात्रेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे घोषणाबाजी करत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

'क्षपणासार'वर 40 विद्वानांचे विचारमंथन; 5 ते 7 ऑक्टोबरदरम्यान अखिल भारतीय विद्वत संगोष्ठी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जैन दर्शनातील कर्मसिद्धांताचा सखोल अभ्यास आणि संशोधनाला चालना देण्यासाठी देशभरातील सुमारे ४० विद्वान छत्रपती संभाजीनगरात एकत्र येणार आहेत. श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन पंचायत मंदिर, राजा बाजार यांच्या वतीने ५ ते ७ ऑक्टोबरदरम्यान त्रिदिवसीय अखिल भारतीय विद्वत संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य उच्चारणाचार्य विनम्रसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात ही संगोष्ठी होणार आहे.



या संगोष्ठीचा मुख्य विषय आचार्य नेमीचंद्र सिद्धांतचक्रवर्ती यांनी रचलेला कर्मसिद्धांतावरील महत्त्वपूर्ण ग्रंथ 'क्षपणासार' हा आहे. या ग्रंथातील कर्मसिद्धांताच्या विविध पैलूंवर विद्वानांकडून चिंतन, मनन व संशोधनपर विचार मांडले जाणार आहेत. जैन आगम व दर्शनातील सूक्ष्म संकल्पना सर्वसामान्यांना समजतील अशा सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

डॉ. अनुपम जैन यांच्या नेतृत्वात व डॉ. आशीष कुमार जैन यांच्या संयोजनाने होणाऱ्या या संगोष्ठीत डॉ. श्रेयांश कुमार जैन, डॉ. सुदर्शन लाल जैन, डॉ. नीलम जैन यांच्यासह अनेक विद्वान सहभागी होणार आहेत. महावीर ठोले व उज्ज्वला शाह यांचाही सहभाग राहणार आहे.

एमजीएममध्ये मोफत कायदेविषयक जनजागृती शिबिर

कायदेशीर हक्क, सायबर फसवणूक, महिलांचे संरक्षण, कौटुंबिक हिंसाचारासह विविध विषयांवर मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सामान्य नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती मिळावी, दैनंदिन जीवनातील कायदेविषयक प्रश्नांवर योग्य मार्गदर्शन मिळावे आणि नागरिक व कायदेव्यवस्था यांच्यातील दरी कमी व्हावी, या उद्देशाने महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या पुढाकाराने स्कूल ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्चच्या लीगल एड क्लिनिकच्या सहकार्याने मोफत कायदेविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले. एसओईटी इमारतीतील लीगल एड क्लिनिकमध्ये हे शिबिर झाले.



शिबिरात नागरिकांना केवळ कायद्याची माहिती न देता त्यांच्या हक्कांचा प्रभावी वापर कसा करावा आणि गरजेच्या वेळी कायदेशीर मदत कशी मिळवावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रस्ता सुरक्षा व गुड समॅरिटन कायदा, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, सायबर सुरक्षा, भारतीय न्याय संहितेअंतर्गत स्वसंरक्षण, महिलांविरुद्ध लैंगिक गुन्हे, मानसिक आरोग्याचा अधिकार, कौटुंबिक हिंसाचार, रॅगिंग, अमली पदार्थ व व्यसनाधीनता, ऑनलाइन फसवणूक, हिट अँड रन, बेदरकार वाहनचालना, पर्यावरणीय कर्तव्ये तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी उपलब्ध कायदेशीर सहाय्य आदी विषयांवर माहिती देण्यात आली.

अॅड. मिर्झा बेग, अॅड. स्वीटी राजपूत, अॅड. अनुष्का पांडे, अॅड. कृष्णदीप सूर्यवंशी, अॅड. सोनिया चिल्लरगे, अॅड. नसीब काझी आणि अॅड. सारिया सिद्दीकी यांनी नागरिकांना मोफत कायदेविषयक सल्ला दिला. कायद्याच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषेत माहितीपत्रके तयार करून एमजीएम विद्यापीठ, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, फिजिओथेरपी व नर्सिंग कॉलेज तसेच एमजीएम स्कूल्समध्ये त्यांचे वितरण केले. विद्यार्थ्यांनी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत कायदेशीर हक्कांची माहिती सोप्या भाषेत दिली. एमजीएम विद्यापीठातील चिंतनगाह येथे विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे दैनंदिन जीवनातील विविध कायदेविषयक समस्या आणि त्यावरील कायदेशीर उपाय प्रभावीपणे मांडले. यावेळी स्कूल ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्चचे संचालक डॉ. सी. एम. राव, विभागप्रमुख डॉ. झरताब अंसारी यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते. आयक्युएसी समन्वयक तथा लीगल एड क्लिनिकच्या समन्वयक अॅड. रीना मानधनी यांनी कायदेविषयक साक्षरतेच्या माध्यमातून नागरिकांना सक्षम करणे आणि विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी अधिक व्यापक करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले.

सेवा संकल्प अभियानातून चारठाणा येथे श्रमदान; पेठ गल्ली परिसराची स्वच्छता

नागरिक व तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग; दर रविवारी स्वच्छता मोहीम राबविण्याचा संकल्प

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी : जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज रविवार (दि.४) रोजी जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील पेठ गल्ली परिसरात आज श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गावातील स्वच्छता, परिसराचे सुशोभीकरण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ही मोहीम घेण्यात आली.



या मोहिमेदरम्यान पेठ गल्ली परिसरातील नाल्यांची साफसफाई करण्यात आली. तसेच रस्ते व सार्वजनिक परिसरात पडलेला प्लास्टिक कचरा आणि इतर सर्व प्रकारचा कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी संकलन करण्यात आले. श्रमदानातून गल्ली परिसर स्वच्छ करून नागरिकांना स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेत गावातील नागरिक तसेच तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सामूहिक श्रमदानातून परिसराची स्वच्छता करताना नागरिकांनी स्वच्छतेची जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाची असल्याचा संदेश दिला.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून गावातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, नाल्या व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. स्वच्छ व सुंदर गाव निर्माण करण्यासाठी लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे.

चारठाणा गावात स्वच्छतेची ही मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, दर रविवारी श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात गावातील नागरिक, तरुण, महिला तसेच विविध घटकांनी नियमितपणे सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोयगाव तालुक्यातील जरंडी येथे 35 बालकांना मोफत औषधी वाटप

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.४ ऑक्टोबर

सोयगाव तालुक्यातील जरंडी येथे झालेल्या बाल आरोग्य तपासणी शिबिरात ३५ बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गीतेश चावडा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बाल आरोग्य तपासणी शिबिरात माळेगाव पिंपरी व जरंडी येथील अंगणवाडीतील बालकाची आरोग्य तपासणी करण्यात आली.



या वेळी डॉ.खालिद सह आदी डॉ.यांनी बालकाची तपासणी केली.या प्रसंगी डॉ.खालिद यांनी सांगितले की लोकसहभागातून समाजसेवक संजय शहापूरकर यांनी कुपोषित बालकांना मोफत औषधी वाटप केल्यामुळे अनेक बालके साधारण श्रेणीत आल्यामुळे कुपोषण कमी होत आहे.या प्रसंगी तालुका समूह संघटक अजय डोंगरे यांनी मार्गदर्शन केले. या शिबिराला अंगणवाडी सेविका ताई गायकवाड पुष्पा वाघ,आशा पंडित,सुरेखा अहिरे,मंगला बिऱ्हारे,रेखा महाजन,शालिनी माळी तसेच आशा सेविका मदतनीस उपस्थित होते.

जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत नव्या काळेची उत्कृष्ट कामगिरी; विभागस्तरीय स्पर्धेसाठी पात्र

अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी नव्या रवींद्र काळे हिने जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विभागस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. नव्या काळे ही जिल्हा परिषद सदस्य निकिता ताई राजू बाबा काळे यांची बहीण असून, तिच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या यशाबद्दल परिसरातून कौतुक होत आहे.



दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत नव्या रवींद्र काळे हिने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. तिच्या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर तिने विभागस्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे.

नव्याने मिळवलेल्या या यशाबद्दल स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे संचालक श्री. दिलीपरावजी काळे, मुख्याध्यापक श्री. पांडुरंग राऊत, क्रीडा शिक्षक सोफियान अहमद सर तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी तिचे अभिनंदन केले. आगामी विभागस्तरीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा देत भविष्यातही अशीच यशस्वी वाटचाल सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

नव्याच्या या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे. तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, आगामी विभागस्तरीय स्पर्धेतही ती उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

एच.ए.आर.सी.तर्फे 12 निराधार आजींना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप

जिंतूर : जिंतूर तालुक्यातील १२ निराधार वयोवृद्ध आजींना पितृपक्ष पंधरवड्यानिमित्त कस्तुरबा गांधी विद्यालय येथे होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटिज (एच.ए.आर.सी.), परभणीच्या वतीने महिनाभर पुरेल इतक्या जीवनावश्यक किराणा साहित्य किटचे वाटप रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी करण्यात आले.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जिंतूर सौ. प्रगती नेवल होत्या. प्रमुख अतिथी ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीधर भोंबे, शिवाजी महाविद्यालय परभणीचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, एच.ए.आर.सी.चे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, उपाध्यक्ष डॉ. शैलेश मंत्री आणि डॉ. दिनेश भुतडा, पत्रकार सचिन रायपत्रीवार यांची प्रमुख उपस्थिती होती

सुरुवातीला प्रास्ताविक करताना प्रकाश डूबे यांनी जिंतूर तालुक्यातील जोगवाडा, वसा, राजेगाव, जिंतूर वस्ती, दहेगाव, बलसा, वडाळी, कोरवाडी, असेगाव, शेवडी, भोगाव आणि रिडज या गावांतील अत्यंत गरजू व निराधार वयोवृद्ध आजींची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली तसेच मुलगा किंवा सून नसलेली व एकटी राहणारी, स्वतःचे घर किंवा शेती नसलेली, पेन्शन अथवा नियमित उत्पन्नाचे साधन नसलेली, वयामुळे रोजमजुरी करणे शक्य नसलेली तसेच अन्नधान्य व दैनंदिन गरजांसाठी इतरांच्या मदतीवर अवलंबून असलेल्या महिलांना प्राधान्य देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लाभार्थी निवडीसाठी त्यांना संतोष बारबिंडे, गोपिका बोडखे, मंगल रोकडे,, अच्युत देशमुख यांनी सहकार्य केले. डॉ. पवन चांडक यांनी संस्थेची भूमिका मांडताना सामाजिक सहकार्यातून ही सामाजिक उपक्रमाची चळवळ मागील 14 वर्षापासून चालू असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रगती नेवल मॅडम यांनी या उपक्रमाचे कौतुक करून समाजातील दानशूर व्यक्तींनी आर्थिक मदत करून ही चळवळ बळकट करण्याचे आवाहन केले.

प्रत्येक किटमध्ये गहू, तांदूळ, तूरडाळ, चनाडाळ, मसूरडाळ, मूगडाळ, साखर, सोयाबीन तेल, चहा, रवा, मैदा, पोहे, मुरमुरा, मीठ, शेंगदाणे, साबुदाणा, हळद, मिरची, मोहरी, जिरे, चटपट मसाला तसेच व्हील साबण, लाईफबॉय साबण, काडीपुडा आदी दैनंदिन वापराच्या जीवनावश्यक साहित्याचा समावेश आहे.

लोकसहभागातून दातृत्व

या उपक्रमाला लोकसहभागातून आर्थिक सहकार्य मिळाले. जुगलजी राठी, शशांक मक्तेदार, रवी मौर्य, विश्वास लव्हेकर, विजय औंढेकर, संजय लाहोटी आणि डॉ. बाळासाहेब जाधव यांनी आर्थिक सहयोग देत सेवाकार्यात सहभाग नोंदविला. त्यांच्या सहकार्यामुळे जिंतूर तालुक्यातील १२ निराधार आजींपर्यंत महिनाभर पुरेल इतके जीवनावश्यक किराणा साहित्य पोहोचविणे शक्य झाले.

पितृपक्षातील या उपक्रमांतर्गत सेलू तालुक्यातील ५, औंढा नागनाथ तालुक्यातील ७, परभणी तालुक्यातील १ आणि जिंतूर तालुक्यातील १२, अशा एकूण २५ निराधार वयोवृद्ध आजींना महिनाभर पुरेल इतके जीवनावश्यक किराणा साहित्य किट देण्यात आले

. सूत्रसंचालन मयूर जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन हजारे यांनी केले. ग्रामीण भागातील अत्यंत गरजू वयोवृद्ध महिलांच्या दैनंदिन अन्नधान्याच्या गरजांना हातभार लावणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911